MRSSK SANGH LTD.
MUMBAI
C
25 JUN 2015
1773
INWARD

**राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्या हंगाम २०१४-१५ मध्ये निर्यात केलेल्या कच्च्या साखरेस प्रति मेट्रीक टन रु.१०००/- प्रोत्साहन रक्कम मंजूर करण्याबाबत.**

Secy/C.
put on website

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : ससाका२०१५/प्र.क्र.५३/२५स**
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ जून, २०१५.

**<u>वाचा</u> :-** भारत सरकार,ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय,अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, नवी दिल्ली विभागाची अधिसूचना क्र. सा.का.नि १२७(अ) दि. २७.२.२०१५

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र राज्यात सन २०१४-१५ च्या ऊस गाळप हंगामात १०.५४ लाख हेक्टर क्षेत्रावर ऊसाची लागवड झाली असून ऊस गाळप हंगामात ऊसाचे ९२९.५६ लाख मेट्रीक टन गाळप होवून ११.२८ % च्या सरासरी उताऱ्याने १०४.८४ लाख मेट्रीक टन साखर उत्पादन झालेले आहे.

२. साखर उद्योगाला आर्थिक मदत करण्यासाठी केंद्र शासनाने कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. याबाबतची केंद्र शासनाच्या अन्न व सार्वजनिक वितरण विभागाची अधिसूचना दि. २७.२.२०१५ रोजी निर्गमित झाली आहे. केंद्र शासनाने सन २०१३-१४ व २०१४-१५ या ऊस गाळप हंगामामध्ये उत्पादित कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रोत्साहनपर अनुदान मंजूर केले आहे. सदर अधिसूचनेतील अट क्र.१० नुसार सदर अनुदानातून Sugar Development Fund (SDF) मधून घेतलेल्या कर्जाची थकीत रक्कम व Levy Sugar Price Equalization Fund ची थकीत रक्कम समायोजित करण्याची अट केंद्र शासनाने समाविष्ट केली आहे. केंद्र शासनाने जाहीर केलेले अनुदान मिळाले तरीही एफ.आर.पी. प्रमाणे ऊस दर देयके ऊस उत्पादकांना अदा करणे साखर कारखान्यांना सद्यःस्थितीत अवघड आहे.

३. राज्यातील चालू वर्षी उत्पादित होणाऱ्या विक्रमी साखरेचे देशांतर्गत विपणन चालू बाजारभावात केल्यास साखर कारखान्यांना आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. साखर कारखान्यांना निर्यातीसाठी अनुदान दिल्यास जास्तीत जास्त साखरेची निर्यात होईल.त्यामुळे सध्याच्या आर्थिक संकटातून राज्यातील साखर उद्योगास मदत होईल व बाजार स्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल. राज्यातून अंदाजे ८ लाख मेट्रीक टन कच्ची साखर या योजनेअंतर्गत निर्यात होण्याची शक्यता आहे. त्यासाठी अंदाजे रु ८० कोटी निधीची आवश्यकता राहील. ही बाब विचारात घेवून केंद्र शासनाच्या दि. २७/२/२०१५ च्या अधिसूचनेनुसार राज्य शासनाने देखील कच्च्या साखरेच्या निर्यातीस प्रोत्साहनपर अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी राज्य शासनाने देखील केंद्र शासनाप्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. केंद्र शासनाने दि. २७.२.२०१५ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या धर्तीवर राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्या हंगाम २०१४-१५ मध्ये निर्यात केलेल्या कच्च्या साखरेस व Import Invalidation of Advance Authorization Scheme अंतर्गत पुरवठा केलेल्या स्थानिक कच्च्या साखरेस केंद्र शासनाच्या उपरोक्त अधिसूचनेत नमूद अटी व शर्तीस अधीन राहून रु. १०००/- प्रति मेट्रीक टन प्रोत्साहन रक्कम शेतकऱ्याच्या FRP ची रक्कम प्रथम प्राधान्याने अदा करण्याच्या अधीन राहून साखर

See. ✓M.D. Saheb

कारखान्यांना मंजूर करण्यात येत आहे. परंतु, कारखान्यांनी Import Invalidation of Advance Authorization Scheme मधील तरतुदीनुसार सदर स्थानिक कच्ची साखर ९० दिवसात refine करुन निर्यात करणे बंधनकारक राहील. FRP अदा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या प्रोत्साहन रकमेतून लाभार्थी साखर कारखान्याकडून राज्य शासनाची थकबाकी प्राधान्याने समायोजित करण्यात यावी. SDF चे कर्ज केंद्र शासनाने दिले असल्या कारणाने त्याची वसूली राज्य शासनामार्फत देण्यात येणा-या प्रोत्साहन रकमेतून करण्यात येऊ नये.

२. केंद्र शासनाने वरील योजनेंतर्गत प्रोत्साहन रक्कम मंजूर केल्याचे आदेश साखर कारखान्यांनी साखर आयुक्त, पुणे यांना सादर केल्यावर, Proof of Export प्राप्त झाल्यानंतरच सदर प्रोत्साहन रक्कम साखर कारखान्यांना अनुज्ञेय राहील.

३. वरील अनुदानासाठी येणारा खर्च मागणी व्ही-२, मुख्य लेखाशिर्ष २४२५ -सहकार, (१०८) इतर सहकारी संस्थांना अर्थसहाय्य, (०३) सहकारी साखर कारखाने, (०३) (१२) सहकारी साखर कारखान्यांना साखर निर्यातीसाठी आर्थिक सहाय्य ( २४२५ १३६८ ) दत्तमत ३३, अर्थसहाय्य या लेखा शीर्षाखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतुदीमधून भागविण्यात यावा. या योजनेसाठी पूरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन दिल्याखेरीज खर्च करता येणार नाही.

४. सदर शासन निर्णय राज्य मंत्रीमंडळाच्या दि. १२ मे, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४१५/अर्थ-१३ दि.१७/६/२०१५ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६२३१७४८२०४९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pramod M Valanj

Digitally signed by Pramod M Valanj
DN: CN = Pramod M Valanj, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2015.06.23 17:50:26 +05'30'

( प्रमोद वळंज )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा -१)/ (लेखा व अनुज्ञेयता-१) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा -२)/ (लेखा व अनुज्ञेयता-२) महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) सहकार आयुक्त, व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
१२) सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)

२. यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व साखर कारखान्यांच्या निदर्शनास आणावेत.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
वित्त विभाग व्यय-२ /अर्थसंकल्प -३/ अर्थसंकल्प -१३, मंत्रालय, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
वरिष्ठ कोषागार अधिकारी , पुणे
अध्यक्ष / कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य, सहकारी बँक मर्या. मुंबई
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., नरीमन पॉईंट, मुंबई.
२५ स- संग्रहार्थ.